लावले आहेत. माणसाने, एका बाजूला जीवनदायी नवनवीन औषधे निर्माण केली आहेत, तर दुसऱ्या बाजूला सर्व संहारक नवनवी शस्त्रे नि अस्त्रेही जन्माला घातली आहेत. शक्तीमान अवकाशयांनांची नि उपग्रहांची निर्मिती करून दूरवरचा अवकाशवेध घेतला आहे, तर खोलवरच्या सागरतळाचाही धांडोळा घेतला आहे. आणि अगदी अलीकडे तर व्यक्तीगत संगणकाने जीवनाच्या सर्वच क्षेत्रांतील कार्यक्षमता वाढवून माणसाच्या कार्यकर्तृत्वाला वेगाचे एक वेगळेच परिमाण बहाल केले आहे. मात्र अखिल विश्वात मूलभूत परिवर्तनाला सहाय्य करणारा, विसाव्या शतकातला सर्वात महान शोध कोणता असेल तर तो आहे, माणसाला लागलेला 'बालका'चा शोध. हा शोध आहे बालकाच्या मेंदूमधील विविध बुद्धिमत्तांच्या स्थाननिश्चितीचा. बालकाच्या ज्ञानसाधनप्रक्रियेचा, बालकाच्या न कळत्या वयातील जाणीवांचा, तसेच हा शोध आहे भाषाहीनतेकडून भाषाप्रभुत्त्वाकडे होणाऱ्या बालकाच्या वाटचालीचा. आणि बालकाला, अगदी अल्पवयातही स्वतःला स्वतःचाच लागत असलेला शोधही यात आहे.

आता, घरी वा शाळेत, आपल्यासमोर उभे राहणारे मूल, हे या सर्व शोधांच्या आधारावर, आपण समजून घेतलेले बालक म्हणून आपल्यासमोर उभे राहणार आहे. आपण आजवर मानत आलो तसे अज्ञानाने घेरलेले ते बालक नाही. तर आपल्या अंतर्गत शक्तींच्या नि आपल्या आजुबाजुच्या आजवरच्या उभ्या राहिलेल्या संस्कृतीच्या आधारे, स्वतःच जगाची ओळख करून घेणारे असे ते मूल आहे. जगातील विविध वस्तू, नि घटनांचे आपल्या पद्धतींनी अर्थ लावणारे, नि त्याचे स्वतःपुरते स्वतंत्र सिद्धांत बांधणारे असे ते बालक आहे. ते ज्ञाननिर्मिती करणारे शास्त्रज्ञही आहे नि ते तेवढेच प्रभावी असे निर्मितीक्षम कलावंतही आहे.

❖